



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २२७, शनिवार २५ मे २०२४ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये


# टेंभूच्या धर्तीवर पारनेरच्या उपसा योजनेला मंजूरी हवी!

**■ अंजनी फाऊंडेशनचा पाठपुरावा ■ रविवारी पठार भागातील शेतकरी ढेंभू प्रकल्पाच्या दौऱ्यावर ■ विश्वनाथ कोरडे यांची माहिती**

पारनेर : प्रतिनिधी

**सातारा जिल्हयातील टेंभू उपसा योजनेच्या धर्तीवर पारनेर तालुक्याच्या पठार भागाला वरदान ठरणाऱ्या पाणी उपसा योजनेस मंजुरी मिळविण्यासाठी भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्या नेतृत्वाखालील अंजना फाउंडेशनच्या माध्यमातून पुढाकार घेण्यात आला आहे. वर्षानुवर्षे पठार भागासाठी मृगजळ ठरलेल्या या योजनेसंदर्भात शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी कोरडे यांच्या नेतृत्वाखाली पठार भागातील शेतकरी रविवारी टेंभू प्रकल्पाच्या भेटीसाठी जाणार आहेत. कोरडे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.**

कोरडे म्हणाले, तालुक्यातील बहुतांश कोरडवाहून शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आजवर अनेक स्थानिक नेतृत्वांनी प्रयत्न केले. आपणही गेल्या पंधरा वर्षांपासून सातत्याने विविध भागातील शेतीच्या पाण्यासंदर्भातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करीत आलेलो आहे. या प्रयत्नांना सर्वांच्या प्रयत्नांनी यश आले मात्र ते मर्यादीत आहे. तालुक्याचा शेतीचा पाणीप्रश्न कायम स्वरूपी निकाली काढायचा असेल तर तालुक्यात उपसा जलसिंचन प्रकल्प राबविणे आवष्यक असल्याचे कोरडे यांनी सांगितले.

पत्रकार परीषदेस वसंतराव शिंदे, किसनराव शिंदे, अर्जुन नवले, अतुल माने, कानिफनाथ ठुबे, दादाभाऊ ठुबे, दिपक रोहोकले, भरत ठुबे, अतुल पाडळकर, रंगनाथ ठुबे, गोकुळ ठुबे, शकील शेख, भाऊसाहेब वाळुंज, नवनाथ ठुबे, सखाराम भागवत, किरण चौधरी, दत्तात्रेय ठुबे, भास्कर ठुबे, संदीप ठुबे, शिवाजी नवले आदी उपस्थित होते.




■ सातारा जिल्हयातील टेंभू पाणी योजनेच्या धर्तीवर पारनेर तालुक्यातही उपसा सिंचन योजना राबविण्याच्या मागणीसंदर्भात विश्वनाथ कोरडे यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका विषद केली.

## फडणवीस सकारात्मक

तालुक्यावरील दुष्काळाचा ठप्पा पुसण्यासाठी कोरडवाहू शेतीला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी उपसा जलसिंचन प्रकल्पाच्या निर्मितीबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सकारात्मक भुमिका पाहता पारनेरमध्ये उपसा जलसिंचन प्रकल्प राबविला जाउ शकतो. तसा विश्वास नागरीकांमध्ये निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठीच टेंभूच्या सहलीचे नियोजन करण्यात आले आहे.

**विश्वनाथ कोरडे**
राज्य कार्यकारणी सदस्य
प्रमुख, अंजनी फाउंडेशन

## ४०० मिटर उंचीवर २२ टीएमसी पाणी !

टेंभू योजनेच्या माध्यमातून शासनाने कृष्णा नदीमधून २२ टीएमसी पाणी सुमारे ४०० मिटर उंचीवर उचलले असून ८० हजार हेक्टर क्षेत्र ओलीता खाली आणण्यात यश आले आहे. युती सरकारच्या काळात सन १९९५ मध्ये या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पासाठी १९५० अश्वशक्तीचे ३३ पंप वापरण्यात आले असून गेल्या तीन ते चार वर्षांपासून ही योजना कार्यान्वीत झालेली असल्याचे कोरडे म्हणाले.

## टेंभूचा न्याय पारनेरला का नाही ?

टेंभू योजनेसाठी ४०० मिटर पाणी उचलले जात असताना पारनेरच्या पठार भागासाठी केवळ २०० मिटर पाणी उचलावे लागणार असून आम्हाला केवळ दोन टीएमसी पाणी हवे आहे. टेंभूच्या धर्तीवर हे पाणी तालुक्याला मिळू शकते. या योजनेसाठी सौर उर्जेवरील वीजेचा वापर केल्यास वीज बिलाचा प्रश्नही निर्माण होणार नाही. टेंभूसाठी शासन सकारात्मक असेल तर पारनेरसाठी का नाही असा सवाल कोरडे यांनी केला.

## प्रदीर्घ काळाचे स्वप्न

पाणी शिल्लक नसल्याचे दिले जाणारे कारण, कुकडी प्रकल्पाच्या पाणी वाटपातील अवमेळ, कुकडीसह चिलेवाडी प्रकल्पातून वर्षानुवर्षे वाहून जात असलेले पाणी या अडथळयांवर मात करून राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर स्थानिक नागरीकांचा रेटा वाढविल्यास उपसा योजनेचे प्रदिर्घ काळापासूनचे स्वप्न सत्यात उतरविणे अवघड नाही.

**विश्वनाथ कोरडे**
राज्य कार्यकारणी सदस्य, भाजपा

## रविवारी टेंभू प्रकल्प सहल

उपसा योजनेसाठी करण्यात आलेल्या पाठराव्याच्या अनुभवातून तसेच तालुक्यातील शेतकरी वर्गाच्या मानसिकतेचा अभ्यास केला असता टेंभू प्रकल्पास भेट दिली असता शासनाच्या माध्यमातून अशा प्रकारचा प्रकल्प तालुक्यात उभा राहू शकतो असा विश्वास शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होईल. प्रकल्प पुर्ण करण्याच्या मागणीस जोर धरला जाईल हा उद्देश डोळ्यापुढे ठेऊन अंजना सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून रविवार दि.२६ रोजी शेतकरी सहलीचे आयोजन करण्यात आले असल्याचे कोरडे म्हणाले.

## मागणी करणारांमध्ये दम नव्हता !

मा. खा. स्व. बाळासाहेब विखे यांच्यापासून या योजनेची चर्चा सुरू आहे. मात्र स्थानिक पातळीवरील नेतृत्व या योजनेच्या मुळापर्यंत गेलेच नाही. शरद पवार हे देखील सकारात्मक होते. मागे अजितदादा कान्हूरला येउन गेले. मोठया स्टाईलने भाषण करून वर्षभरात पाणी देण्याची घोषणा त्यांनी केली. १५-२० वर्षात काहीच झाले नाही. देवेंद्र फडणवीस यांनीही चर्चेला बोलविले मात्र त्यावेळीही कोणीच पुढाकार घेतला नसल्याचे सांगत वसंत शिंदे यांनी मागणी करणारांमध्ये दम नव्हता. विश्वनाथ कोरडे यांनी मात्र मोठया आत्मविश्वासाने या योजनेसाठी पुढाकार घेतल्याचे ते म्हणाले.

## योजनेबाबत सकारात्मक चर्चा

तालुक्याच्या या उपसा योजनेसदर्भात चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. या पाठपुराव्यानुसार कृष्णा खोरे महामंडळाच्या कार्यकारी संचालकांसोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत या योजनेसंदर्भात सकारात्मक चर्चा झाली असल्याचे कोरडे म्हणाले.

# भावी आमदार राणीताई लंके!

**■ वाढदिवसाचे औचित्य साधून कार्यकर्त्यांकडून लंके यांचे लॉन्चिंग ■ जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव**



■ नीलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांना जिल्हाभरातील कार्यकर्त्यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

पारनेर : प्रतिनिधी

**महाविकास आघाडीचे लोकसभा निवडणूकीतील उमेदवार नीलेश लंके यांनी राजीनामा दिल्यानंतर आता आगामी विधानसभा निवडणूकीसाठी त्यांच्या पत्नी राणीताई लंके या उमेदवार असतील असा संदेश राणी लंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिला. दरम्यान, लंके यांना शुभेच्छा देण्यासाठी जिल्हयासह संपूर्ण नगर दक्षिण मतदारसंघातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी पारनेरमध्ये हजेरी लावली होती.**

पंचायत समितीच्या माजी उपसभापती, जिल्हा परीषदेच्या सदस्या असलेल्या राणीताई लंके या लोकसभेच्या उमेदवार असतील अशी चर्चा होती. शिवसंवाद यात्रेच्या माध्यमातून लंके यांनी दक्षिण नगर लोकसभा मतदारसंघ पिंजुन काढला होता. विविध कार्यक्रमांनाही त्यांची लागणारी हजेरी लक्षवेधी होती. ऐनवेळी मात्र राणीताई लंके यांचे नाव मागे पडून स्वतः नीलेश लंके यांना लोकसभेच्या निवडणूकीत उडी घ्यावी लागली. त्यासाठी त्यांनी अजित पवार यांच्या गटातून शरद पवार गटात प्रवेश केला आणि तुतारीच्या चिन्हावर निवडणूक लढविली. लंके यांनी गेल्या दोन वर्षात या मतदारसंघात केलेल्या साखर पेरणीच्या जोरावर त्यांनी भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्यापुढे तगडे आव्हान उभे करून सध्या ते निवडणूकीच्या रेसमध्ये आहेत.

## लोकसभेसाठी लंके यांचा राजीनामा

**लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी नीलेश लंके यांनी आमदारकीचा राजीनामा देण्याचा घेतलेला निर्णय त्यांच्या समर्थकांसाठी धक्का देणारा होता. त्यांनी निर्णय जाहिर केल्यानंतर अनेकांच्या डोळयात आश्रू उभे राहिले. लंके यांच्याप्रती असलेल्या प्रेमातूनच विधानसभेसाठी त्यांच्या पत्नीचे नाव पुढे करीत कार्यकत्यांनी राणीताई यांचे आतापासूनच लॉन्चिंग सुरु केले आहे.**

लंके हे लोकसभेत गेल्यानंतर त्यांच्या पत्नी राणीताई लंके या विधानसभेच्या उमेदवार असतील अशी चर्चा काही महिन्यांपासून सुरू होती. परंतू राणीताई यांच्या दि. २४ मे रोजीच्या वाढदिवसानिमित्त ही चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली. गुरूवारी रात्रीपासूनच भावी आमदार राणीताई लंके अशा पोस्ट सुरू झाल्या. शुक्रवारी दिवसभर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी नगर जिल्हयातून विशेषतः दक्षिणेतून मोठया संख्येने कार्यकर्त्यांनी पारनेरात हजेरी लावली होती. अनेकांनी आणलेल्या केकवर भावी आमदार राणीताई असा उल्लेख होता.






# शिरसुल्यातील झाडांना न्यायालयाचा तात्पुरता दिलासा !

**गायरान जमिन हस्तांतरण करण्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्या आदेशाला स्थगिती**

पारनेर : प्रतिनिधी

**निघोज समूह ग्रामपंचायतीसाठी राबवण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेच्या साठवण बंधाऱ्यासाठी तोडण्यात येणाऱ्या तब्बल ८२० झाडांना उच्च न्यायालच्या आदेशामुळे दिलासा मिळाला आहे.या झाडांची कत्तलीपासून तात्पुरतं सुटका झाली आहे.पारनेर तालुक्यातील शिरसुले येथील गट क्रमांक १४३ मधील गायरान जमीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याच्या नगरच्या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे सुटी कालीन न्यायाधीश संजय देशमुख यांनी तात्पुरती स्थगिती दिली आहे.आता याप्रकरणी १९ जून २०२४ रोजी पुढील सुनावणी होणार असल्याची माहिती याचिकाकर्त्यांचे वकील स्वप्नील मुळे यांनी दिली.**

निघोज,शिरसुले, वडगाव गुंडसह १२ वाड्यांसाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत

सुमारे ३० कोटी रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना राबवण्यात येत आहे.या योजनेच्या साठवण बंधारा, जलशुद्धीकरण प्रकल्प व पाण्याच्या टाकीसाठी शिरसुले येथील गट १४३ मधील ६ हेक्टर (१५ एकर) जमिन अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केली आहे.मात्र या जमिनीवर शिरसुले ग्रामस्थांनी तीस, चाळीस वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केलेली आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी वर्ग करण्यात आलेल्या जमिनीवर सरासरी ३० ते ४० वयाची ८२० झाडे उभी आहेत.साठवण बंधाऱ्याच्या कामासाठी ही झाडे तोडण्याला शिरसुले ग्रामस्थांचा विरोध आहे.

ग्रामस्थांनी आपला विरोध जिल्हाधिकारी,उपवनसंरक्षक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे नोंदवला मात्र कोणीही दखल घेतली नाही.ग्रामस्थांनी अखेर आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर पारनेरच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी झाडे तोडण्यासाठी परवानगी नाकारली.मात्र



■ शिरसुले येथील गायरान जमिनीवर सरासरी ३० ते ४० वयाची,२५ ते ३० हजार झाडे उभी आहेत.

आमचा पाणीपुरवठा योजनेला विरोध नाही तर झाडे तोडण्याला विरोध आहे.आमच्या वाडवडिलांनी तीस, चाळीस वर्षांपूर्वी झाडे लावली.त्यांचे संगोपन केले.गायरानावर २५ ते ३० हजार झाडांची वनराई उभी केली.त्यासाठी आमच्या पिढ्यांनी कष्ट केले.या योजनेच्या कामासाठी निघोज परिसरात दोन, तीन ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध असताना झाडे तोडण्याचा अट्टाहास का?

**दिगंबर घोगरे**,याचिकाकर्ते,
इंदूबाई घोगरे, ग्रामपंचायत सदस्य.







# चंदेरी

मुंबईत आपलं हक्काच घर असावं असं स्वप्नं प्रत्येकाचं असतं. मराठी मनोरंजन विश्वातील बऱ्याच कलाकारांनी गेल्या काही वर्षांत मुंबईत स्वतःचं घर खरेदी करत स्वप्नपूर्ती केली आहे. पृथ्वीक प्रताप, रुचिरा जाधव, प्रसाद ओक, मंगेश देसाई, अश्विनी महांगडे, गिरीजा प्रभू, मयुरी वाघ या कलाकारांनी नवीन घर खरेदी करत अलीकडेच स्वप्नं पूर्ण केलं. आता या यादीत आणखी एका अभिनेत्रीचं नाव जोडलं गेलं आहे. छोट्या पडद्यावरील मालिकांमधून घराघरांत लोकप्रिय झालेल्या अदिती द्रविडने अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर तिच्या चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे.

## अदिती द्रविडने घेतलं नवीन घर



अदितीने मुंबईत हक्काचं घर खरेदी केलं आहे. याची खास पोस्ट आणि आपल्या घराची पहिली झलक तिने इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. पहिल्या फोटोमध्ये गृहप्रवेश पूजन तर, तिने शेअर केलेल्या दुसऱ्या फोटोमध्ये तिच्या नव्या घराचा खोली क्रमांक ८०९ असल्याचं पाहायला मिळत आहे. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर अदितीने ही आनंदाची बातमी तिच्या चाहत्यांसह नेटकऱ्यांना दिली आहे. फायनली आय सेड येस टू मुंबई... माझं स्वतःचं घर, स्वप्नपूर्ती! असं कॅप्शन अदितीने या फोटोला दिलं आहे. अदितीच्या या नव्या घरातून अतिशय सुंदर व्ह्यू पाहायला मिळत आहे. सध्या अभिनेत्रीवर कलाविश्वातून कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. समृद्धी केळकर, अभिजीत खांडकेकर, सावनी रवींद्र या कलाकारांनी तिने शेअर केलेल्या पोस्टवर कमेंट्स करत अदितीला नव्या घरासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, अदिती 'कलर्स मराठी' वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'सुंदरा मनामध्ये भरली' मध्ये झळकली होती. या मालिकेचं कथानक लतिकावर आधारित होतं. यामध्ये लतिकाची भूमिका अभिनेत्री अक्षया नाईकने साकारली होती. तर, अभ्याची मैत्रीण नंदिनीच्या भूमिकेत अदिती झळकली होती. गेल्यावर्षी या मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. याशिवाय गेल्यावर्षी प्रदर्शित झालेल्या बाईपण भारी चित्रपटासाठी तिने 'मंगळागौर' हे गाणं लिहिलं होतं.

## 'सिकंदर'मध्ये रश्मिकाची वर्णी



नॅशनल क्रश रश्मिका मंदानानं तिच्या अभिनय, तसेच लूक्समुळे चाहत्यांना भुरळ पाडली आहे. आता ही साउथ स्टार लवकरच बॉलीवूडचा भाईजान सलमान खानबरोबर आगामी चित्रपटात झळकणार आहे. २०२२ रोजी प्रदर्शित झालेल्या 'गुड बाय' चित्रपटाद्वारे रश्मिकाने बॉलीवूड सिनेसृष्टीत पदार्पण केलं. त्यानंतर रश्मिका संदीप रेड्डी वांगा यांच्या 'ॲनिमल' चित्रपटात रणबीर कपूरबरोबर झळकली. २०२३ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटानं जगभरात ९१७.८२ कोटींची कमाई केली. आता रश्मिका मंदाना पुन्हा एकदा बॉलीवूड चित्रपटात झळकणार आहे. सलमान खानच्या बहुप्रतीक्षित आगामी चित्रपटात म्हणजेच 'सिकंदर'मध्ये रश्मिका झळकणार आहे. या चित्रपटाची अधिकृत घोषणा रश्मिकानं आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. प्रख्यात दिग्दर्शक ए. आर. मुरुगदास आणि सलमान या चित्रपटासाठी पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहेत. रश्मिकाचे चाहते तिच्या नव्या चित्रपटासाठी उत्सुक होते. रश्मिकानं तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर याबाबत पोस्ट शेअर केली आणि लिहिलं, तुम्ही सगळे मला माझ्या आगामी चित्रपटाबद्दल विचारत होता. त्याबद्दलच आज मी तुम्हाला सांगणार आहे. मी 'सिकंदर' या चित्रपटाचा भाग आहे आणि त्यामुळे मी खूप कृतज्ञ आहे. हा सिनेमा २०२५ मध्ये ईदच्या दिवशी प्रदर्शित होणार आहे. 'सिकंदर'च्या शूटिंगची सुरुवात मे महिन्यात सुरू होणार आहे. या चित्रपटाचं चित्रीकरण भारत आणि युरोपमध्ये होणार आहे. चित्रपटाच्या बजेटबद्दल जरी अजूनही अधिकृत माहिती समोर आली नसली तरी अंदाजे या चित्रपटाचं बजेट ४०० कोटी इतकं असेल. त्याशिवाय या चित्रपटानं २०२५ च्या ईदच्या रिलीज स्लॉटमध्ये आधीच आपलं स्थान निश्चित केलं आहे. चाहते सलमान खान आणि रश्मिका मंदानाची केमिस्ट्री रुपेरी पडद्यावर पाहण्यासाठी खूप उत्सुक आहेत. दरम्यान, रश्मिकाच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर 'सिकंदर' वगळता अल्लू अर्जुन आणि रश्मिकाचा 'पुष्पा-२ ' चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. रश्मिकाचं 'छावा' या हिंदी चित्रपटाचं शूटिंग नुकतंच पूर्ण झालं आहे. त्यात विकी कौशलबरोबर ही अभिनेत्री झळकणार आहे. 'द गर्लफ्रेंड' हा तेलुगू चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्याच्या एक दिवसानंतर ही साउथ स्टार धनुषबरोबर शूटिंगला सुरुवात करणार आहे.

## रितेशला वडिलांकडून मिळाली 'ही' मोठी शिकवण

मराठीसह बॉलीवूडमध्ये आपली 'लय भारी' ओळख निर्माण करणारा अभिनेता म्हणून रितेश देशमुखला ओळखलं जातं. महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख म्हणजेच वडिलांच्या परवानगीने राजकारणापेक्षा वेगळं क्षेत्र निवडत रितेशने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. माझ्या नावाची मी काळजी घेतो, तुझ्या नावाची तू काळजी घे... वडिलांनी दिलेल्या या एका सल्ल्यामुळे रितेश देशमुखचं संपूर्ण आयुष्य बदललं होतं. त्यांना दिलेल्या शब्दानुसार आज रितेशने इंडस्ट्रीत स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. कुटुंब, करिअर, जिनिलीयाचा पाठिंबा याविषयी अभिनेत्याने नुकत्याच देवयानी पवारच्या युट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत भाष्य केलं आहे.

वडिलांबद्दल सांगताना अभिनेता म्हणाला, मला असं वाटतं आपले संस्कारच आपल्याला घडवतात. त्यामुळे विशिष्ट वयात आपल्यावर कसे संस्कार होतात हे खूप महत्त्वाचं असतं. मी माझ्या वडिलांकडून आयुष्यात प्रत्येक गोष्ट शिकलो. आमचं संपूर्ण बालपण बाभळगावात म्हणजेच लातूरमध्ये गेलं. त्यामुळे आजही सुट्ट्या पडल्या की, मुलांना घेऊन आम्ही लातूरला गावी जातो. त्याठिकाणी आम्ही अनेक सण एकत्र साजरे करतो. रितेश म्हणाला, की आपल्या गावाशी आपली नाळ कायम जोडली गेलेली असते. आयुष्यात तुम्हाला 'आदर' मिळणं यापेक्षा मोठी गोष्ट कोणतीच नाहीये ही सर्वात मोठी शिकवण त्यांनी मला दिली. तुम्हाला वाटतं एखाद्याने तुमचा आदर करावा, तर सर्वप्रथम तुम्ही संबंधित व्यक्तीचा आदर करायला शिकलं पाहिजे. आमच्या घरी कोणीच एकमेकांना अरे-तुरे बोलत नाहीत. माझे आजोबा मला तुम्ही बोलायचे. मी माझ्या दोन्ही भावांना आदराने आम्ही-तुम्ही म्हणतो. माझी दोन्ही मुलं मला आदराने आवाज देतात. ही शिकवण माझ्या वडिलांकडून मला मिळाली. बऱ्याचदा लोक सांगतात, 'अरे मला तू म्हण...तुम्ही बोलू नकोस'. पण, ते मला आता जमत नाही. कारण, जी शिकवण आपल्याला मिळते तिच कायमस्वरुपी राहते. अगदी काही जवळचे मित्र असतील तरच मी 'तू' वगैरे म्हणतो, असं रितेश देशमुखने सांगितलं. दरम्यान, रितेश देशमुखच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर २०२२च्या अखेरिस प्रदर्शित झालेल्या त्याच्या 'वेड' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली होती. यानंतर आता अभिनेता लवकरच 'हाऊसफुल ५' चित्रपटात झळकणार आहे. याशिवाय यंदाच्या शिवजयंतीच्या मुहूर्तावर रितेशने छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर आधारित एका नवीन ऐतिहासिक चित्रपटाची घोषणा केलेली आहे. हा चित्रपट २०२५ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



## रणवीर सिंहने लग्नाचे फोटो डिलीट का केले?

**अभिनेत्री दीपिका पदुकोण व रणवीर सिंह बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल आहे. ऑनस्क्रीनबरोबरच ऑफस्क्रीन केमिस्ट्रीमुळे दोघे नेहमीच चर्चेत असतात. लवकरच आई-बाबा होणाऱ्या या कपलचा एक फोटो नुकताच व्हायरल झाला होता. अशातच रणवीरने दीपिका आणि त्याचे लग्नातले फोटो त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून डिलीट केले आहेत.**

मंगळवारी रणवीर सिंहने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून दीपिका आणि रणवीरचे जुने फोटो डिलीट केले किंवा लपवले आहेत, अशी चर्चा सुरू आहे. जानेवारी २०२३ पासूनचे त्यांचे सगळे जुने फोटो अभिनेत्याने डिलीट केले. यामध्ये या कपलच्या लग्नातले फोटोही गायब झाले आहेत. जरी २०१८ मधील त्यांच्या लग्नाचे फोटो इन्स्टाग्राम प्रोफाईलवर नसले, तरी अलीकडचे त्यांचे दिवाळी सेलिब्रेशनचे आणि लग्नाच्या वाढदिवसाचे फोटो त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर आहेत.

अभिनेत्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एकूण १३३ पोस्ट्स आहेत. रणवीरच्या फोटो डिलीट करण्यामागे सोशल मीडिया स्ट्रॅटेजी असण्याची दाट शक्यता आहे. या जोडप्यासाठी हे नवीन नाही, कारण यापूर्वीदेखील दीपिका पदुकोणने असंच काहीतरी केलं होतं. अभिनेत्रीने तिच्या सगळ्या पोस्ट डिलीट केल्या होत्या. ३१ डिसेंबर २०२० रोजी तिने तिच्या इन्स्टाग्राम प्रोफाइलवरील एकूण एक पोस्ट डिलीट केली होती आणि एका ऑडिओ क्लिपद्वारे नवी सुरुवात केली होती. नुकतेच दीपिकाच्या बेबी बंपचे फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या फोटोजमध्ये रणवीर आणि दीपिका एका जहाजातून उतरताना दिसत होते. दीपिकाने या फोटोमध्ये लूज टीशर्ट ड्रेस आणि निळ्या रंगाची जिन्स परिधान केली होती, तर रणवीर सिंगने ऑल व्हाईट लूकची निवड केली होती. या फोटोमध्ये दीपिकाचं बेबी बंप दिसतंय असं चाहते म्हणत होते. रणवीर आणि दीपिकाचा हा अनसीन फोटो रेडीटवर व्हायरल झाला होता. लग्नाच्या सहा वर्षांनंतर दीपिका आणि रणवीर आई-बाबा होणार आहेत. २९ फेब्रुवारीला याबाबत दीपिका-रणवीरने चाहत्यांना 'गुड न्यूज' दिली होती. या कपलने सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर केली होती. या पोस्टमध्ये 'सप्टेंबर २०२४' असे लिहिले होते आणि त्याच्या खाली तिचे व रणवीरचे नाव लिहिले होते. तसेच या पोस्टमध्ये लहान बाळाचे कपडे व खेळण्यांचे चित्रही रेखाटले होते. दरम्यान, दीपिका पदुकोणच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर दीपिका नुकतीच 'फायटर'मध्ये झळकली होती. 'सिंघम अगेन' या आगामी चित्रपटातदेखील दीपिका दिसणार आहे, तर रणवीर कपूर 'डॉन-३' या चित्रपटात कियारा अडवाणीबरोबर झळकणार आहे.



## 500 कोटींची कंपनी उभारणाऱ्या नेत्रहीन उद्योजकाच्या आयुष्यावर आहे 'श्रीकांत' चित्रपट...



बॉलीवूड अभिनेता राजकुमार रावची मुख्य भूमिका असलेला बायोपिक 'श्रीकांत' हा चित्रपट शुक्रवारी (१० मे रोजी) सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला. या बहुप्रतिक्षीत चित्रपटाच्या ट्रेलरपासूनच चाहते 'श्रीकांत'च्या रिलीजची आतुरतेने वाट पाहत होते. 'श्रीकांत' हा नेत्रहीन उद्योगपती आणि बोलंट इंडस्ट्रीजचे संस्थापक ३२ वर्षीय श्रीकांत बोल्ला यांचा बायोपिक आहे. तुषार हिरानंदानी दिग्दर्शित चित्रपटात राजकुमार रावने श्रीकांत बोल्ला यांची मुख्य भूमिका साकारली आहे. या चित्रपटाची प्रेरणादायी कथा आणि राजकुमारच्या दमदार अभिनयाचं समीक्षक आणि प्रेक्षक खूप कौतुक करत आहेत. पण हा चित्रपट रिलीजच्या पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर फारशी कमाल दाखवू शकलेला नाही. 'श्रीकांत'च्या कमाईची सुरुवातीची आकडेवारी समोर आली आहे.

सॅकनिल्कच्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, 'श्रीकांत' ने रिलीजच्या पहिल्या दिवशी २.२५ कोटी रुपये कमावले आहेत. हे प्राथमिक आकडे आहेत, अधिकृत डेटा आल्यानंतर या आकडेवारीत थोडे बदल होऊ शकतात. 'श्रीकांत' चित्रपटाच्या निर्मितीसाठी निर्मात्यांनी जवळपास ४० कोटी रुपये खर्च केले आहेत. राजकुमार राव व्यतिरिक्त चित्रपटात ज्योतिका, आलिया एफ. आणि शरद केळकर यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. पहिल्या दिवसाची कमाई फार चांगली नसली तरी वीकेंडला या चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. श्रीकांत हे व्यावसायिक आणि बोलंट इंडस्ट्रीजचे मालक आहेत. त्यांचे गाव आंध्र प्रदेशातील मछलीपट्टणम शहराजवळ होते. त्यांना शिक्षणासाठी अनेक किलोमीटर चालत जावं लागायचं. भाऊ आणि मित्रांच्या मदतीने ते हा प्रवास करायचे. दिसत नसल्याने शाळेत फार कोणी त्यांच्याशी बोलायचं नाही. आठव्या वर्षी त्यांना एका अंध मुलांच्या शाळेत दाखल करण्यात आलं. इथेच ते क्रिकेट, पोहणं आणि बुद्धिबळ शिकले. माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर पुढे इंजिनिअरींगच्या शिक्षणासाठी त्यांना आयआयटीमध्ये प्रवेश घ्यायचा होता, परंतु ते अंध असल्यामुळे आयआयटीने त्यांना प्रवेश नाकारला. या नकाराने न खचता त्यांनी शिक्षण व्यवस्थेविरुद्ध खटला दाखल केला आणि सहा महिन्यांत खटला जिंकला. त्यानंतर पुढील शिक्षण घेतलं. श्रीकांत बोल्ला हे पहिले नेत्रहीन विद्यार्थी आहेत ज्यांनी मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये सायन्स मॅनेजमेंटचा अभ्यास केला. नंतर भारतात परतल्यावर त्यांनी हैदराबादमध्ये बोलंट इंडस्ट्रीजची स्थापना केली, त्यासाठी १० कोटी रुपये खर्च आला होता.

## अर्पितासोबत डिव्होर्सबद्दल आयुष शर्मा म्हणाला...



अभिनेता आयुष शर्मा आणि सलमान खानची बहीण अर्पिता खान शर्मा यांच्या लग्नाला जवळपास १० वर्षे झाली आहेत. या जोडप्याने वर्षभर एकमेकांना डेट केल्यावर लग्नगाठ बांधली होती. आपल्या १० वर्षांच्या संसारात या दोघांनी अनेक चढ-उतार पाहिले आहेत. अर्पिताला रंगावरून, वजनावरून ट्रोल केलं जातं, आयुषलाही पत्नीच्या दिसण्यावरून बऱ्याचदा नकारात्मक कमेंट्स येतात. इतकंच नाही तर या जोडप्याच्या घटस्फोटाच्या अफवाही अनेकदा येतात. २०१९ मध्ये अचानक हे जोडपं घटस्फोट घेणार असल्याच्या अफवा पसरू लागल्या, ते ऐकून धक्का बसला होता, असं आयुषने सांगितलं. एका मुलाखतीत तो म्हणाला, की मला एक छोटा प्रसंग आठवतो. मी माझ्या मुलाला डोसा खाऊ घालण्यासाठी बाहेर पडलो होतो आणि तिथून परत येताना मला मीडियावाल्यांनी अडवलं आणि विचारलं की अर्पिता आणि मी घटस्फोटासाठी अर्ज करत आहोत का? हा प्रश्न ऐकून धक्का बसला. घरी आल्यावर मी अर्पिताला विचारलं की ती मला घटस्फोट देणार आहे का? त्यावर मग आम्ही बराच वेळ हसत होतो, असं आयुषने सांगितलं. मागच्या १०-११ वर्षात अर्पिता आयुषला त्याच्या करिअरमध्ये खंबीरपणे साथ देत आहे. काम चांगलं नसेल तर ती स्पष्ट शब्दांत टीकाही करते, असंही आयुष म्हणतो. अर्पिता खूप कठोर टीकाकार आहे. पण तिचे शब्द कठोर असले तरी ती खूप प्रामाणिक आहे. ती अशी व्यक्ती आहे जी अतिशय ऑब्जेक्टिव्हली चित्रपट पाहते. मी ज्या प्रकारचे चित्रपट करतो त्या तुलनेत तिची आवड वेगळी आहे. तिला माहित आहे की मला लोकांसाठी कमर्शिअल चित्रपट बनवायला आवडतात, पण तिला मात्र सत्य कथांवर आधारित चित्रपट पाहायला जास्त आवडतं, असा आयुषने खुलासा केला. १३ वर्षांपूर्वी २०११ मध्ये आयुष आणि अर्पिताची प्रेमकहाणी एका पार्टीत सुरू झाली होती. आयुषने सुरुवातीला अर्पितासमोर आपल्या मनातल्या भावना व्यक्त केल्या होत्या, तर अर्पिताने त्याला उत्तर देण्याआधी वेळ घेतला होता. नंतर या दोघांचं लग्न वर्षभराने २०१४ साली लग्न झालं. या जोडप्याला मुलगा अहिल आणि मुलगी आयत अशी दोन अपत्ये आहेत. लवकरच या दोघांच्या लग्नाला १० वर्षे होतील.

## शॉर्ट न्यूज

### पाथर्डीच्या बाजारात अडीच लाखांची बैलजोडी

■ **पाथर्डी :** येथील बैलबाजारात गावरान खिलार जातीच्या बैलजोडीला आज दोन लाख ५१ हजार रुपये अशी विक्रमी किंमत मिळाल्याने ही बैलजोड बाजारात एकच चर्चेचा विषय ठरली. तालुक्यातील पाडळी येथील प्रगतशील शेतकरी व सरपंच अशोक गर्जे यांची ही बैलजोडी चारचाकी वाहना ऐवढी किंमत आल्याने आजच्या बाजारात चर्चेचा विषय ठरली. शेवगाव तालुक्यातील बागायतदार शेतकरी विजय कातकडे यांनी ही जिवा शिवाची बैलजोड विक्रमी किंमतीला विकत घेतली. यावेळी वाजत गाजत गुलालाची उधळण करत खरेदीदार शेतकरी व विक्री करणारे शेतकरी यांना फेटा बांधुन या बैलजोडी ची मरिवणुक काढण्यात आली.

### नवनाथ कुताळ यांना पुरस्कार

■ **श्रीरामपूर :** येथील पत्रकार संघाचे सदस्य व वात्रटिकाकार नवनाथ कुताळ यांना महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी या संस्थेचा मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा ३२ वा राज्यस्तरीय दर्पण पुरस्कार जाहीर झाला आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या १७८ व्या पुण्यतिथीनिमित्त पोंभुर्ले (ता. देवगड) येथील दर्पण सभागृहात ६ जानेवारी २०२५ या दिवशी पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे अध्यक्ष रवींद्र बेडकिहाळ यांनी ही घोषणा केली.

### बौद्ध पौर्णिमेनिम्मित सरबत वाटप

■ **नगर :** संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती (बौद्ध पौर्णिमा) निमित्त सिद्धी बाग नीलक्रांती चौक येथे साळवे कुटुंबीयांच्या वतीने सरबत वाटप करताना धम्म सेवक अरविंद साळवे समवेत चेतन साळवे, आनंद साळवे, भावेश साळवे, भगवान साळवे, किशोर साळवे, अजय साळवे, अशोक पारधे, गणेश पाखरे, विजय शिरसाठ, श्रीकांत भोसले, कैलास दळवी, सलीम शेख, गिरीश जाधव, हेमंत साळवे, आनंद साळवे, अक्षय वाकचौरे, करण साळवे, अवि शिंदे आधीसह साळवे कुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अरणगावात भरदिवसा घरफोडी

■ **अरणगाव :** नगर तालुक्यातील अरणगावात भरदिवसा घरफोडी करून चोरट्यांनी दोन लॅपटॉप, इंटरनेट राऊटर तीन मोबाईल, युपीएस व इतर साहित्य चोरून नेले आहेत. याप्रकरणी नगर तालुक पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनिषा कैलास उपाध्ये (वय ४०) यांनी फिर्याद दिल आहे. फिर्यादी यांचे अरणगाव शिवारात घर असून ते त्यांनी सुमारास बंद केले होते. त्यानंतर चोरट्यांनी घराच्या पाठीमागील सेफ्टी डोअरचे कुलुप तोडून घरातील सामानार्च उचकापाचक करून दोन लॅपटॉप, इंटरनेट राऊटर, तीन मोबाईल, युपीएस व इतर साहित्य चोरून नेले.

### करगळ वस्तीवर भक्तांची गर्दी

■ **जामखेड :** तालुक्यातील हळगाव परिसरात करगळ वस्ती या ठिकाणी श्रीनाथ म्हस्कोबाचे भव्य आसे मंदिर आहे या ठिकाणी सालाबाद प्रमाणे यात्रा उत्सवानिमित्त दोन दिवस धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते या ठिकाणी पारंपारिक ढोल ताशा सनई बॅण्ड पथकाच्या निनादात देवाची सजवलेल्या पालखी मध्ये मिरवणूक काढण्यात आली या नंतर मानाचे मानकरी यांच्या हस्ते देवाला हळद लावून नाथम्हस्कोबाचा व माता जोगेश्वरीचा विवाह सोहोळा संपन्न झाला.

# आमची बाई, कै. सौ. सुभद्राबाई बर्वे

**आमची बाई म्हणजे आमच्या सासूबाई कै. सौ. सुभद्राबाई मारूती बर्वे यांचे निधन दि.१६ जुन २०२४ रोजी झाले. त्यांच्या स्मृती आजही आमच्या सर्वांच्या मनात घर करून बसल्या आहेत. त्यांच्या स्मृतीस उजाळा देण्याच्या दृष्टीने आमच्या बाईविषयी दोन शब्द ..**

आमची बाई ही सर्वांचीच आई होती. आमची बाई ही लहानग्यांची माय होती तर निराधारांसाठी ती पाय होती. अशा आमच्या बाईचा जन्म मुंबईत १९५७ साली झाला. बाईचं प्राथमिक शिक्षण मुंबई येथील महानगरपालीकेच्या शाळेत झाले. पुढील शिक्षण माध्यमिक शाळेत झाले. त्यावेळी बाईला शिक्षक म्हणून छगन भुजबळ हे लाभले. जुन्या काळातील इयत्ता ११ वी पर्यंतचे शिक्षण बाईने राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी पुर्ण केले.

तसं तर बाईच माहेर हे पारनेर तालुक्यातील पिंप्रीपठार. पागिरे कुटूंबातील ही बाई १९७२ साली वर्बे परिवाराची स्नुषा झाली. ऐन दुष्काळाच्या काळात बाई बर्वे परिवाराची सासुरवाशीन झाली. सगळीकडे दुष्काळाने थैमान घातलेले होते. पोटाला पुरेसे अन्न मिळत नव्हते. अशा स्थितीत बर्वे परिवारात आलेल्या बाईमुळे सुकाळाचे दिवस बर्वे परिवाराला पहावयास मिळाले. ते म्हणजे बाईचे पतीराज यांना लग्न झाल्याबरोबर २१ दिवसांतच शासकीय नोकरीचा आदेश प्राप्त झाला.परिवारात आनंदाचे वातावरण दिसू लागले. पायगुण चांगला आहे असे सर्वच जण बोलत होते. आणि उभ्या आयुष्यभर या चांगल्या पायगुण असलेल्या बाईमुळेच आमच्या परिवाराच्या संसाराची वेलू उंचच उंच जात राहिली आणि तिचा बहर अधिकच दिसू लागला. त्या काळी आपल्या पतीला नोकरी जरी मिळाली तरी पगार फारसा नव्हता. एकत्रित कुटूंब पध्दती असल्याने पगार पुरत नसायचा. पण मास्तरीण म्हणून आमच्या बाईने दिमाख दाखविला नाही किंवा संपूर्ण मोठया कुटूंबात मीच शिक्षित आहे, असेही कधी आमच्या बाईला कधी गर्वाने घेरले नाही. त्यामुळेच बाईने संसारासाठी व कुटूंबासाठी शेतीची कामे करण्यास सुरूवात केलीच.




मुंबईला वाढलेली व शिकलेली बाई, गावी शेतीची काहीही माहिती नाही. एकदा बाईनेच आम्हाला संगितलेला प्रसंग मी आपणासमोर सांगेन. घरच्यांनी बाईला शेतातून मिरच्या तोडून आणावयास सांगितले होत. बाई शेतात गेली. तीचे मिरच्यांची झाडेच उपटून आपली. दोष बाईचा नव्हता तर तीला न मिळालेल्या अनुभवाचा होता. त्यापुढील काळात बाईने शेतीची कामे समजून उमजून घेऊन करण्याचा प्रयत्न केला. आणि आमची बाई शेतीत यशस्वी झाली.

आमच्या बाईमध्ये सहकार्य करण्याची पहिल्यापासूनच सवय होती. स्वतः ला नसले तरी चालेल पण शेजारच्याला किंवा आपल्या नातेवाईकांची गरज कशी भागेल हाच उद्देश नेहमी असायचा. दरम्यानच्या काळात बाईला दोन मुले व १ मुलगी असे अपत्ये झाली. मोठा मुलगा डॉ. उदय, नंतर सचिन व शेवटची कन्या सारिका. मोठया मुलाला मित्रांची खूप आवड. प्राथमिक, माघ्यमिक शिक्षण घेत असताना शाळेतील मुलांना सहकार्य करण्याची उदयची व बाईची इच्छा त्यावेळी प्रकर्षाने दिसली. ज्या मुलांना बाईने वर्षभर जेवणाची सोय घरी केली. ऐवढेच नाही तर राहण्याची सोय, वह्या पुस्तकांची सोय केली. तीच मुले आजही आपल्यावरील उपकाराची ओळख स्वतः सांगतात. अशी ही सहकार्य करणारी बाई फक्त आठवणी ठेउन आमच्यातून निघून गेली.

जुन्या काळी बाई ही एकटीच शिक्षित असल्याने संपूर्ण एकत्रीत परिवाराची जबाबदारी बाईवर येत असल्याने बाई अधिकाधिक धाडसी, निर्णयी व कणखर वृत्तीची बनली. पुढे दुर्दैवाने अर्धांगवायूचा झटका आल्याने बरेच दिवस आजाराचे दुःख बाईला सहन करावे लागले. पंरतू ईश्वरी कृपेने बाईने त्यावरही मात केली. याचे कारण म्हणजे परक्यांच्या मुलालाही आपल्या मुलाइतकेच प्रेम आपुलकी व मदतीचा हात देण्यासाठी बाईने कधी हात मागे घेतला नाही. आदीवासी मजुर असो, शेजारी पाजारी असो कधी कुणाचाही व्देश-मत्सर केला नाही. अडचणीच्या वेळी सर्वांसाठी धावून जाणारी आमची बाई तेवढीच प्रेमख तेवढीच मायाळू, आणि तितकीच हट्टी बाई. सर्वांशी प्रेमाने व अधिकार वाणीने बोलत असायची. तीचे बोलणे हे स्पष्ट असायचे. कोणताही निर्णय घेताना बाईचा निर्णय सहजा सहजी चुकत नव्हता. एखाद्या प्रशासकाला लाजवेल अशी निर्णय क्षमता बाईच्या अंगी मला पहावयास मिळाली. घरातील सर्व निर्णय घेण्याची क्षमता आमच्या बाईमध्ये होती. म्हणूनच म्हणते की आमच्या परिवाराच्या कोर्टाला आम्ही सर्वजण पोरके झालो आहोत, आणि तेही कायमचे. आमच्या बाईच्या खूप आठवणी आहेत. बाईला आमच्या सर्वांच्या वतीने भावपूर्ण आदरांजली.

**शब्दांकन**
**सौ. वैशाली उदय बर्वे (सुन)**
**सौ. आरती सचिन बर्वे (सुन)**

## महाविकास आघाडी ४० हून अधिक जागा जिंकणार - बाळासाहेब थोरात

**संगमनेर : प्रतिनिधी**

**देशात भाजप सरकारविरुद्ध मोठी लाट असून राज्यात महाविकास आघाडी ४० हून अधिक जागा जिंकणार आहे, असा ठाम विश्वास माजीमंत्री, आमदार बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.**

आमदार थोरात यांनी संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील गावांमध्ये जाऊन तेथील ग्रामस्थांशी नुकताच संवाद साधला. अनेक भागात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्या संदर्भाने तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला केल्या आहेत.



लोकसभा निवडणुकीच्या प्रचार रणधुमाळी सुरू होती. त्यानिमित्ताने राज्यभर दौरेकेले. राज्यभर महाविकास आघाडीच्या प्रचार सभांनामोठाप्रतिसाद मिळाला. भाजपविरोधात लोकांना प्रचंड संताप आहे. येत्या ४ जूनच्या निकालात महाविकास आघाडीला ४० हून अधिक जागा येतील, असा विश्वास थोरातांनी व्यक्त केला.

## जिल्हा परिषदेचे सीईओ आशिष येरेकर यांची बदली

**नगर : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेचे सीईओ आशिष येरेकर यांची ठाणे येथे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली झाली आहे. याबाबतचे आदेश सामान्य प्रशासन विभागातून नुकतेच काढण्यात आले आहेत.**




नगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार घेण्यापूर्वी आशिष येरेकर हे गडचिरोली जिल्ह्यात अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. ते २०१८ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. ५ मे रोजी आशिष येरेकर यांची नगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती झाली होती. येरेकर यांनी त्यांच्या कार्यकाळात बहुतांश योजनांना गती दिली होती.

(पान १ वरून)

## शिरसुळ्यातील झाडांना न्यायालयाचा तात्पुरता दिलासा !

सरकारी जागा असल्याचे कारण देत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी, वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या आदेशाला न जुमानता तीन वेळा झाडे तोडण्याचा प्रयत्न केला मात्र ग्रामस्थांनी तो हाणून पाडला.जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांनी झाडे तोडण्यासाठी पोलिस अधीक्षकांकडे संरक्षण मागितले.

दरम्यान, शिरसुले येथील गायरान जमीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश रद्द करावा,झाडे तोडण्यासाठी संरक्षण देण्यापासून पोलिस अधीक्षकांना रोखावे अश्या मागण्या करणारी याचिका शिरसुले ग्रामस्थांच्या वतीने दिगंबर घोगरे यांनी औरंगाबाद खंडपीठात केली.सदर याचिका २२ मे रोजी दाखल करून घेताना उच्च न्यायालयाचे सुटी कालीन न्यायाधीश संजय देशमुख यांनी याचिकाकर्त्यांच्या मागण्या तात्पुरत्या स्वरूपात मान्य केल्या आहेत.त्यामुळे शिरसुले गायरानातील ८२० झाडांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.शिरसुले ग्रामस्थांच्या वतीने स्वप्नील मुळे यांनी तर सरकारच्या वतीने वकील नेहा कांबळे यांनी काम पाहिले.









# मळगंगा ट्रस्टसाठी ८७ उमेदवारी अर्ज दाखल

## ४२ वर्षात प्रथमच होणार निवडणूक

**निघोज : प्रतिनिधी**

**राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या निघोज येथील मळगंगा देवस्थानच्या मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या विश्वस्तांच्या निवडीसाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत असून अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ८७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. ट्रस्टच्या स्थापनेनंतर ४२ वर्षानंतर विश्वस्त निवडीसाठी प्रथमच निवडणूक होत आहे. आतापर्यंत सर्व निवडी बिनविरोध करण्यात येत होत्या.**

ट्रस्टच्या बिनविरोध निवडीची परंपरा कायम ठेवण्यासाठी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी गावकरी प्रयत्नशिल असून त्यात त्यांना यश येते का हे पाहणे औत्सुक्याचे राहिल.



मळगंगा विकास ट्रस्टच्या निवडणूकीसाठी अखेरच्या दिवशीही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

### बिनविरोधसाठी पुन्हा बैठक बोलवा

**बिनविरोध निवडीसाठी काही नेतेमंडळी प्रयत्नशील असल्याने आजी, माजी विश्वस्त, पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक यांनीही अर्ज दाखल केले आहेत. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी ग्रामस्थांची पुन्हा बैठक बोलविण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.**

### तर लंके १२ लाखांची देणगी देणार !

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके हे निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्नशिल आहेत. निवडणूक बिनविरोध झाल्यास लंके यांनी देवस्थानसाठी १२ लाख रूपयांची देणगी जाहिर केली आहे. दि. २७ मे ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अखेरची तारीख असून त्यावेळी बिनविरोध निवडणूक झाल्यास आपण १२ लाख रूपयांचा धनादेश देवस्थान ट्रस्टकडे देणार असल्याचे लंके यांनी जाहिर केले आहे.**

### यांनी केले उमेदवारी अर्ज दाखल

**मंगेश सखाराम वराळ, संतोष खंडू वराळ, रुपेश मारुती ढवण, मुकुंदराव रामचंद्र निघोजकर, गणेश चंद्रकांत वराळ, निवृत्ती मळी तनपुरे, बाबाजी किसन तनपुरे, ज्ञानेश्वर दगडू लंके, बबन बळवंत वराळ, भगवान दशरथ भालेकर, संदीप रामचंद्र वरखडे, दत्तात्रय श्रीपत लंके, संपत रामचंद्र वराळ, मनोहर बाबाजी राऊत, गंगाराम जबाजी वराळ, खंडू विठ्ठल भुकन, दत्तात्रय खंडू भुकन, सुदर्शन सुर्यकांत लोढा, उत्तम काशिनाथ लामखडे, शांताराम भाऊ लंके, अमृता महादू रसाळ, रामदास महादू वरखडे, ठकाराम बाळू लंके, वसंत बाबाजी कवाद, शांताराम बापू कळसकर, विठ्ठल भाऊसाहेब कवाद, रामदास नानाभाऊ ससाणे, संतोष भाऊ रसाळ, विश्वास ठकाराम शेटे, अशोक बापू वरखडे, शंकर चंद्रकांत लामखडे, मोहन जयवंत कवाद, शांताराम ठकाराम ढवळे, संदीप वामन वराळ, सिमा संदीप वराळ, लक्ष्मण रामभाऊ ढवळे, अनिल रघुनाथ लंके, दिलीप यशवंत लाळगे, सदानंद भिकाजी ढवळे, मंगेश भिवाजी लंके, बाळासाहेब मारुती लामखडे, दामू देवराम लंके, दत्तात्रय भिका कुदळे, ज्ञानदेव नामदेव लंके, वसंत काशिनाथ ढवण, ॲड. ज्ञानेश्वर रामदास लामखडे, रमेश भाऊ वरखडे, दिलीप रामचंद्र ढवण, राहुल भाऊसाहेब वराळ, मंगेश बाळासाहेब लाळगे, संगिता मंगेश लंके, काळुराम सहदेव गजरे, शिवाजीराव गणपत वराळ, गौतम सखाराम तनपुरे, कृष्णा सोमनाथ वरखडे, सोमनाथ दौलतराव वरखडे, मोहिणी सोमनाथ वरखडे, मंगेश नानाभाऊ वरखडे, बबुशा बाबुराव वरखडे, देवराम गोविंद लामखडे, सुभाष नानाभाऊ वरखडे, ज्ञानेश्वर विठ्ठल वरखडे, ज्ञानेश्वर पांडुरंग शेटे, रोहिदास हरिभाऊ लामखडे , दत्तात्रय बाबुराव लाळगे, राजेंद्र भागा लाळगे, जया ज्ञानेश्वर लंके, अर्जुन पांडुरंग लामखडे, अनिल शिवाजी शेटे, शंकर कृष्णा वरखडे, राजू भाऊ लाळगे, सुनिल रघुनाथ पवार, रावसाहेब आनंदा वराळ, बजरंग रामचंद्र वराळ, प्रभाकर नारायण कवाद, मोहन नाथा खराडे, दत्तात्रय जबाजी वराळ, ज्ञानेश्वर दशरथ भालेकर, गजानन गवराम ठुबे, भास्कर तुकाराम वराळ, संतोष पांडुरंग ईधाटे, बाबाजी पाराजी शेटे, देवराम बाळाजी वराळ, शिवाजी लक्ष्मण भुकन, मंगेश कुंडलिक वराळ.**

# पारनेरकरांच्या माध्यमातून मुंबईत नगर जिल्ह्याचा नावलौकीक

## मा. मंत्री आदित्य ठाकरे यांचे गौरोद्गार

**निघोज : प्रतिनिधी**

**मुंबईस्थित पारनेरकरांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर नगर जिल्हयाचा नावलौकीक वाढविल्याचे गौरवोद्गार माजी मंत्री तथा शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी काढले.**

मुळ पारनेरकर असलेले मुंबईतील बदलापुर येथील अनिकेत थोपटे यांच्या मोहर चित्रपटाच्या चित्रप्रदर्शनाचे ठाकरे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले, त्यावेळी त्यांनी पारनेरकरांविषयीच्या भावना व्यक्त केल्या. प्रसिध्द चित्रकार सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घतलेल्या सहकलाकारांच्या चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

ठाकरे म्हणाले, अनिकेत थोपटे यांच्यासारख्या युवकाने मोहर चित्रपटाच्या माध्यामातून चित्रपट सृष्टीमध्ये मोठे काम केले असून नगर जिल्हयाच्या नावलौकीकात भर घातली आहे. हे प्रदर्शन म्हणजे गुरू शिष्रू परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे नमुद करून ठाकरे पुढे म्हणाले, थोपटे व भोसले यांनी मुंबईत राहुन चित्रकलेच्या क्षेत्रात चांगले काम केले आहे. पारनेर हा गुणवंताची खाण आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पारनेर तालुक्यातील गुणवंतांचा आपल्याशी मोठा संपर्क असून सातत्याने त्यांच्या विविध कार्यक्रमांत सहभागी होऊन त्यांचा सन्मान करण्याचे भाग्य आम्हास लाभते हा आमचा बहुमान असल्याचे ठाकरे म्हणाले.



अनिकेत थोपटे यांच्या मोहर चित्रपटाच्या चित्रप्रदर्शनाचे आदीत्य ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

### कलेचा उत्कृष्ट नमुना

**अनिकेत थोपटे, सायली कोठेकर, सीतामराम राउळ, कविता दुडी, स्वरूप पाताडे, ओमकार अरोस्कर, या कलाकारांनी मोहर या चित्रप्रदर्शनात बालपण, अध्यात्म, वन्यजीवन इ. वेगवेगळया विषयांवरील चित्रे मांडली असून कलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून या प्रदर्शनाकडे पाहिले जात असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.**

आमदार सचिन आहीर, आमदार सुनील शिंदे, मा. आ. जगन्नाथ अप्पा शिंदे, मा. उपमहापौर हेमांगी वरळीकर, हिरल ढोलकिया, कला दिग्दर्शक दिगंगर तळेकर, दत्तात्रेय देसाई हे प्रमुख आतिथी म्हणून उपस्थित होते. सुरेश भोसले यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

# रांधे येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

## ३० रूग्णांवर शस्त्रक्रिया करणार

**रांधे :प्रतिनिधी**

**तालुक्यातील रांधे येथील रांधुबाई देवस्थान ट्रस्टच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिररात १५४ रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात येऊन ३० रूग्णांवर अल्पदरात शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे देवस्थानच्या विश्वस्तांकडून सांगण्यात आले.**

अलिकडच्या काही वर्षांमध्ये डोळयांचे विकार बळावत असून डोळयांची काळजी घेणे ही काळाची गरज आहे. डोळयांबाबत काही विकार निर्माण झाल्यास तात्काळ उपचार करणे गरजेचे असते. त्यासाठी अशा शिबिरांची उपयुक्तता महत्वाची ठरते. डोळयांवरील उपचार महागडे असल्याने विशेषतः ग्रामीण भागात अशा शिबिरांचे मोठया प्रमाणात आयोजन करण्यात येते. या शिबरांचा रूग्णांकडून फायदा घेतला जातो. अशा प्रकारच्या शिबिरांचा ग्रामीण जनतेने लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. दरम्यान, रांधूबाई देवस्थान ट्रस्ट, तरूण मंडळांनी पुढाकर घेउन हे शिबिर अयोजित केल्याबददल ग्रामस्थांच्या वतीने त्यांना धन्यवाद देण्यात आले.

रांधूबाई देवस्थान ट्रस्ट तसेच





रांधूबाई देवस्थान ट्रस्टच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

गावातील सर्व तरूण मंडळे यांच्या पुढाकारातून शशांक खोसे यांच्या अळकुटी येथील शशांक आप्टिकल्स व मोहन ठुसे नेत्र रूग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे अयोजन करण्यात आले होते. यावेळी आबाजी आवारी, अमोल आवारी, संतोष साबळे, हौशाभाऊ आवारी, अनिल आवारी, किरण आवारी, प्रवीण आवारी, सुर्यकांत आवारी, नारायण साबळे, बजरंग आवारी, शरद आवारी, उत्तम गायकवाड, मच्छिंद्र चौधरी, विनोद फापाळे, बाळासाहेब साबळे, दादाभाऊ सोनवणे, संदीप आवारी, अमोल शिंदे, अंकुश साबळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पवार, आव्हाडांची अण्णांवरील टीका मर्यादा ओलांडणारी

## शरद पवळे यांचा आक्षेप

**सुपा : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलेल्या वक्तव्यावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिलेल्या प्रतिक्रीयेवर आ. रोहित पवार व आ. जितेंद्र आव्हाड यांनी केलेली टीका मर्यादा ओलांडणारी असल्याचे सांगत या टीकेवर सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांनी आक्षेप घेतला आहे.**

अण्णा हजारे यांच्या टीकेनंतर रोहित पवार यांनी केलेली स्वयंघोषीत गांधी ही टीका ज्येष्ठांच्या विचारांवर खालच्या पातळीवर जाऊन केलेली टीका आहे. अशी टीका करणे म्हणजे स्वतःला वजाबाकीच्या दिशेने घेऊन जाण्यासारखे आहे. जितेंद्र आव्हाड हे नैतिकता सोडून अण्णा हजारे यांना टार्गेट करण्याचा प्रयत्नही मर्यादा ओलांडणार आहे. अण्णांच्या आंदोलनामुळे अनेकांना खुर्ची सोडावी लागली, अनेकांना तुरूंगवास भोगावा लागला, काहींना सत्तेतून



पायउतार व्हावे लागले याच रागातून हजारे यांना लक्ष्य केले जात असल्याचे पवळे यांनी म्हटले आहे.

पवळे पुढे म्हणतात, अण्णा हजारे यांचे देशासाठी मोठे योगदान असून गाव, तालुका, जिल्हा, राज्य पातळीवर मर्यादीत न राहता दिल्लीपर्यंत आंदोलने करीत त्यांनी सरकारला अनेक कायदे संमत करण्यास भाग

### अण्णांवरील टीकेने विश्वास मिळणार नाही

**समाजाने नाकारलेल्यांनी आपली क्षमता वाढवावी, समाजात विश्वास निर्माण करून ध्येय साधावे. अण्णांवर टीका करून सामाजाचा विश्वास मिळविता येणार नाही. अण्णांनी स्वतःला सत्ता, पैसा यापासून दुर ठेवत फकीराप्रमाणे ते आपले जीवन व्यतीत करीत आहेत. अशा व्यक्तीमत्वावर बोलणे म्हणजे सुर्यावर थुंकण्यासारखे होईल.**

**शरद पवळे, सामाजिक कार्यकर्ते**

पाडले आहे. आदर्श गावाची संकल्पना राबवितानाच शासकीय कार्यालयात नागरीकांची होणारी विवंचना, वारंवार मारावे लागणारे हेलपाटे थांबविण्यासाठी अण्णांनी संघर्ष केला आहे. त्यांचा हा संघर्ष विसरता येणार नाही असे पवळे यांनी सांगितले.

कोणत्याही पदाची लालसा न ठेवता सत्ता, संपत्तीसह भौतीक सुखाचा त्याग करून जनतेचा आवाज बनून हजारे यांची मोठे काम उभे केले आहे. अण्णा हजारे यांच्यामुळे झालेल्या कायद्यांचा आधार घेऊन समाज परिवर्तनाचे काम करणाऱ्या समाजसेवकांना मोठा आधार मिळाला असून अनेक तरूण समाजकारणात पुढे येत आहेत ही हजारे यांच्या आंदोलनाची निष्पत्ती आहे. दुषीत राजकारणातून समाजामध्ये द्वेष पसरविण्याची स्पर्धा सुरू असून राजकारणातून समाजपरीवर्तनाचे स्वप्न पाहणारांनाही आपले हात काळे करताना आपण पाहतो आहोत. त्यामुळे सामान्य जनतेला निवडणूकाही नकोशा झाल्याचे पवळे यांनी सांगितले.

# एसडीआरएफ जवानांच्या कुटूंबियांना दहा लाखांची मदत

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची घोषणा



**अकोले : प्रतिनिधी**

**तालुक्यातील सुगाव घटनेत मृत झालेल्या एस.डी.आर.एफ जवानांच्या कुटूंबियांना दहा लाख रुपयांची मदत देण्यात येणार असल्याची घोषणा महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.**

प्रवरा नदीपात्रात मृत झालेल्या तरूणाचा मृतदेह शोधण्यासाठी स्थानिक प्रशासनाने एस.डी.आर.एफच्या पथकाला पाचारण केले होते. सुगाव येथे पथक दाखल झाल्यानंतर त्यांनी शोधकार्य सुरू केले मात्र पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने या पथकातील पी.एस.आय प्रकाश नाना शिंदे, कॉन्स्टेबल राहूल गोपीचंद पावरा, वैभव सुनिल वाघ यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

या घटनेन प्रशासन हादरले, ग्रामस्थांच्या मदतीने या तीन जवानांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. यापैकी पंकज पंढरीनाथ पवार, अशोक हिम्मतराव पवार यांना पुढील उपचकरा करीता स्थानिक रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेचे वृत्त समजल्या नंतर पालकमंत्री ना.विखे पाटील यांनी महसूल आणि पोलीस प्रशासनास सूचना देवून, मृत जवानांच्या कुटूंबियांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना दिल्या. दुपारी स्वत: पालकमंत्री विखे पाटील, मा.आ.वैभव पिचड, राज्याच्या पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला, विशेष पोलीस महानिरीक्षक बी.जी. शेखर, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्यासह महसुल व प्रशासनातील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

यासर्व मृत जवानांच्या पार्थिवावर मंत्री विखे पाटील आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली अर्पण केली. पोलीस पथकाने शोकधून आणि बंदूकीची सलामी देवून मृतदेह त्यांच्या गावी रवाना करण्यात आले. याप्रसंगी जवानाचे नातेवाईक आणि त्याच्या सहकाऱ्यांना भावना आवरणे अवघड झाले होते. यासर्वांना मंत्री विखे पाटील यांनी दिलासा दिला.


यासर्व जवानांच्या कुटूबियांना दहा लाख रुपयांची मदत करण्यात येणार असल्याची माहीती ना.विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून, सर्व मृतदेह नातेवाईकांकडे रवाना करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. पाण्यामध्ये बुडालेल्या अन्य दोन व्यक्तिंचा तपास करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येत असून, धरणातून पाण्याचा प्रवाहही आता बंद करण्यात आला आहे. याच कारणासाठी युवकांनी केलेल्या रस्ता रोको आंदोलनासही मंत्री ना.विखे पाटील यांनी भेट दिली. घटना घडल्यानंतर पाण्याचा प्रवाह कमी करण्याच्या सुचना आपण यापुर्वीच दिल्या होत्या परंतू आंदोलकांच्या भावना लक्षात घेवून संपूर्ण प्रवाहच बंद करण्याच्या सुचना जलसंपदा विभागाला त्यांनी दिल्या.

# आरती काळे नगरकर यांना मानाचा भास्कर पुरस्कार जाहीर

## दि.२६ मे ला गोव्यातील पणजी येथे वितरण

**सुपा : प्रतिनिधी**

**येथील कालिका कलाकेंद्राच्या संचालिका,प्रसिद्ध ख्यातनाम लावणीसम्राज्ञी तथा अभिनेत्री आरती काळे नगरकर यांना महाराष्ट्र जर्नलिस्ट फाउंडेशनचा मानाचा भास्कर पुरस्कार जाहीर झाला असून तो गोव्यातील पणजी येथे ता. २६ मे रोजी दीनानाथ मंगेशकर कला अकॅडमीमधे प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी माजी मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे, पद्मश्री विनायक खेडेकर, ना. श्रीपाद नाईक, रमाकांत खलप, माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत, राजतीलक नाईक, पद्मश्री संजय पाटील, नलिनी दिदी पोतदार, राजीव लोहार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.**



आरती काळे नगरकर या लावणीसम्राज्ञी व अभिनेत्री असून त्यांचे कथक, भरतनाट्यम् हे शास्त्रीय शिक्षण झालेले आहे. त्यांनी दुबईतील महाराष्ट्र मंडळमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, जपान, इंडोनेशिया, रशिया आदी ठिकाणी आंतरराष्ट्रीय कार्यक्रम सादर केले आहेत.

त्यांना यापुर्वीही अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. यामध्ये अकलूज लावणी महोत्सव, हॅट्रिक (अकलूज), आई महोत्सव, महाराष्ट्र शासन, कलानिकेतन, नाट्य परिषद मुंबई, कानुश्री आनंदयात्री धुळे, संगीत नाट्य अकादमी बिस्मिल्ला खान युवा पुरस्कार (दिल्ली), महालक्ष्मी माता पुरस्कार (पुणे) आदींचा समावेश आहे तर लावणी महोत्सव, नाशिक, पुणे फेस्टिव्हल, वेरूळ महोत्सव, राजभवन लावणी कार्यक्रम (मुंबई), महाराष्ट्र राज्य लावणी महोत्सव (मुंबई), ठाणे महोत्सव, साहित्य संमेलन (मुंबई), दिल्ली महोत्सव, आग्रा महोत्सव, चेन्नई कार्यक्रम, प्रजासत्ताक दिन २०११, नवी दिल्ली चित्ररथ संचलन, जत्रा-कार्निवल मराठी महोत्सव भोपाळ आदी ठिकाणी कार्यक्रम सादर केले आहेत.

त्यांनी काही चित्रपटात काम केले असून अनेक टीव्ही चॅनलवर कार्यक्रमात सहभाग घेतला आहे. महाराष्ट्र जर्नलिस्ट फाउंडेशनचा मानाचा भास्कर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# बेल्हेसह आळेफाटा परिसरात एटीएम सेंटरची सुरक्षा रामभरोसे !

## दाद कोणाकडे मागायची ? नागरिकांचा सवाल

**आळेफाटा : प्रतिनिधी**

**बेल्हे, आळेफाटा परिसरात असणाऱ्या विविध बँकांच्या एटीएम सेंटर्सची सुरक्षा ''रामभरोसे'' असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या एटीएम सेंटर्सवर सुरक्षा रक्षकच नसल्याने इथे काही समस्या निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेईल? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होते आहे.**





बेल्हे येथील जुना मोटार स्टॅन्ड नाक्यावर असलेले बँक ऑफ इंडियाचे एटीएम, राजुरी येथील गणेश दूध उत्पादक संस्थेच्या आवारात असलेले एटीएम, आळेफाटा येथील बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम, एसटी बसस्थानक भागात असलेले युनियन बँकेचे एटीएम तसेच आयसीआय बँकेचे एटीएम यासह विविध बँकांच्या एटीएम सेंटर्सची सुरक्षा सध्या वाऱ्यावर आहे.

बेल्ह्यातील शरद बँकेच्या एटीएम सेंटर वगळता एकाही ठिकाणी एकही सुरक्षारक्षक नसल्याचे निदर्शनास आले. परिसरात ग्रामीण भागातून येणारे नागरिक व्यवहारासाठी एटीएमचा वापर करतात. अशा नागरिकांना पैसे काढताना निर्माण होणाऱ्या समस्येसाठी बाहेरील व्यक्तींची मदत घ्यावी लागते. अशा परिस्थितीत कोणी पैसे काढून लुटले तर दाद कोणाकडे मागायची?, असा सवाल आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com